शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, मिरज
Government Medical College, Miraj
Miraj Pandharpur Road, Miraj, Dist.- Sangli - 416410.
Website: gmcmiraj.edu.in Email: deangmcmiraj@yahoo.co.in Phone: 0233/2232090-99 Fax: 0233-2231959

जा.क्रं.शावैममि/पीजी/डीएमएलटी/एम.एस्सी.मेडि.बायोके./प्रवेश-२०२१, दिनांक २१.१०.२०२१

## नोटीस.

पीजी.डीएमएलटी व एम.एस्सी.मेडिकल बायोकेमेस्ट्री प्रवेशासाठी अर्ज दाखल केलेल्या गुणवत्ता यादीतील सर्व उमेदवारांसाठी सूचनाः-

१) सांगली जिल्हयातील कोव्हीड-१९ चा प्रादुर्भाव तसेच शासनाने तिस-या लाटेची वर्तविलेली शक्यता विचारात घेता सर्व उमेदवारांनी Social Distancing नियमाचे पालन करणे गरजेचे आहे. त्यामुळे सर्व उमेदवारांनी तसेच त्यांचा समवेत आलेल्या पालकांनी/नातेवाईकांनी मास्कचा वापर करणे गरजेचे आहे.

२) एम.एस्सी.मेडिकल बायोकेमेस्ट्री अभ्यासक्रमाच्या एकूण ४ जागा आहेत. दिनांक २०.१०.२०२१ रोजी प्रसिध्द करण्यात आलेल्या गुणवत्ता यादीतील सर्व उमेदावारांनी दिनांक २२.१०.२०२१ रोजीच्या मुलाखतीकरीता उपस्थित राहावे.

३) पीजी.डीएमएलटी अभ्यासक्रमाच्या एकूण १२ जागा आहेत. दिनांक २०.१०.२०२१ रोजी प्रसिध्द करण्यात आलेल्या गुणवत्ता यादीतील उमेदवारांनी खालील प्रमाणे प्रवर्ग निहाय नमुद केलेनुसार दिनांक २२.१०.२०२१ रोजीच्या मुलाखतीकरीता उपस्थित राहावे.

- खुला प्रवर्ग- ५ जागांसाठी गुणवत्ता यादीतील गुणवत्तेनुसार खुल्या प्रवर्गातील प्रथम २५ उमेदवारांनी उपस्थित राहावे.
- ई.डब्ल्यु.एस.(EWS) -१ जागा, गुणवत्ता यादीतील EWS ४ अर्ज प्राप्त उमेदवारांनी उपस्थित राहावे.
- अनु.जाती-२ जागांसाठी गुणवत्ता यादीतील गुणवत्तेनुसार अनु.जाती प्रवर्गातील प्रथम १० उमेदवारांनी उपस्थित राहावे.
- अनु.जमाती- १ जागा, एकच अर्ज प्राप्त असल्याने सदर उमेदवानी उपस्थित राहावे. सदर उमेदवार उपस्थित नसल्यास सदरच्या जागेवर अनु.जाती प्रवर्गातील उमेदवाराचा गुणवत्तेनुसार विचार करण्यात येईल.
- विमुक्त जाती(VJ) -१ जागा, एकच अर्ज प्राप्त असल्याने सदर उमेदवानी उपस्थित राहावे. सदर उमेदवार उपस्थित नसल्यास सदरची जागेवर भटक्या जमाती (NT-B) प्रवर्गातील उमेदवाराचा गुणवत्तेनुसार विचार करण्यात येईल.
- इतर मागास प्रवर्ग (OBC) -२ जागांसाठी गुणवत्ता यादीतील गुणवत्तेनुसार प्रथम १० उमेदवारांनी उपस्थित राहावे.
- मुलाखतीपूर्वी सकाळी ११.३० पासून उमेदवारांच्या मुळ प्रमाणपत्रांची डॉ.कुलकर्णी हॉल येथे (मा.अधिष्ठाता कार्यालयाचे बाजुस असलेल्या)पडताळणी केली जाणार आहे. तरी सर्व संबंधीत उमेदवारांची सकाळी ११.३० पासून डॉ.कुलकर्णी हॉल येथे सामाजिक अंतर राखत व मास्क परिधान करुन उपस्थित राहावे.

...२

४) मुलाखतीवेळी उमेदवारांकडे जाहिरातीमध्ये नमुद सर्व मुळ प्रमाणपत्रे असणे आवश्यक आहे.

५) ज्या उमेदवारांकडे जात प्रमाणपत्र/जात वैधता प्रमाणपत्र/लागु असल्यास नॉन क्रिमिलेअर प्रमाणपत्र अथवा त्यांचे टोकन, उपलब्ध नसेल त्या उमेदवारांना आरक्षणांतर्गत प्रवेशासाठी विचार केला जाणार नाही अथवा त्यांना प्रवेश दिला जाणार नाही.

६) प्रवेश निश्चिती नंतर उमेदवारांनी मुळ पासिंग/डिग्री प्रमाणपत्र,तीन्ही वर्षाच्या गुणपत्रिका (शेवटच्या वर्षाच्या गुणासह एकत्रित गुणपत्रक असलेली फायनल गुणपत्रिका) मेडिकल फिटनेस,टी.सी., गॅप असल्यास ॲफीडेव्हीट, तसेच (टी.सी. व विद्यापीठ मायग्रेशन प्रवेश निश्चितीनंतर) व इतर आवश्यक प्रमाणपत्रे विहित कालावधीत पी.जी.विभागात जमा करणे आवश्यक आहे.

७) दिनांक २२.१०.२०२१ रोजी च्या मुलाखतीमध्ये जे उमेदवार पात्र ठरतील त्यांनी जाहिरातीमध्ये दिलेनुसार प्रवेश निश्चितीवेळी संपूर्ण शासन फिस् भरणा करणे आवश्यक आहे. तद्नंतरच उमेदवारांचा प्रवेश निश्चित केला जाईल. विहित वेळेत उमेदवाराने फिस् भरणा केली नाही, तर प्रतिक्षा सूचिवरील उमेदवाराचा प्रवेशासाठी विचार केला जाईल.

GOVT. MEDICAL COLLEGE MIRAJ

उप-अधिष्ठाता (पीजी),
शासकीय वैद्यकीय महाविद्यालय,मिरज